सकाळ

# आसमंत-आर्ट सर्कलतर्फे गणेशमूर्ती स्पर्धा

**रत्नागिरी, ता. २४ :** लाडक्या बाप्पाच्या आगमनाची तयारी जोरदार सुरू आहे. स्वत:च्या हातांनी बाप्पा साकारून त्याची प्रतिष्ठापना घरी करावी, या हेतूने रत्नागिरीत गेली सात वर्षे स्पर्धा आयोजित केली जात आहे. यंदा ही स्पर्धा रविवारी (ता. २६) पटवर्धन हायस्कूलमध्ये आहे.

नंदकुमार पटवर्धन यांच्या संकल्पनेतून साकारलेली व आसमंत बेनवोलन्स फाउंडेशन पुरस्कृत माय फ्रेंड गणेशा पर्यावरणस्नेही गणपतीमूर्ती बनवण्याची स्पर्धा आर्ट सर्कल दरवर्षी आयोजित करत आहे.पटवर्धन हायस्कूलमध्ये सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत स्पर्धा, बक्षीस वितरण कार्यक्रम होईल. सकाळी स्पर्धा व दुपारी लगेच बक्षीस वितरण असा कार्यक्रम होणार आहे. ही स्पर्धा वेगळेपणा जपणारी आहे.




या स्पर्धेत पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी असे गट आहेत. तिसरा गट हा गेल्या स्पर्धांतील विजेत्यांचा गट आहे. आतापर्यंत ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी स्पर्धेसाठी नावनोंदणी केली आहे.

आसमंत फाउंडेशनतर्फे स्पर्धेसाठी पुठ्ठा व शाडूची माती दिली जाते. विद्यार्थ्यांनी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत मूर्ती बनवायची आहे. त्यानंतर स्पर्धेचे परीक्षण करून क्रमांक काढले जाणार आहेत. दुपारी ३ वाजता त्याच ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.

**"आसमंत फाउंडेशन विद्यार्थी, पर्यावरणासाठी विविध उपक्रम वर्षभर राबवते. विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या निमित्ताने साकारलेल्या गणेशाची प्रतिष्ठापना घरी करावी. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळण्याकरीता ही स्पर्धा आयोजित करते.**
**- नंदकुमार पटवर्धन**